सत्यमेव जयते

PUNE METROPOLIS

प्रधान मंत्री आवास योजना

Pradhan Mantri Awaas Yojana

# प्रधानमंत्री आवास योजना

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

नाव: ____________________________________________

अर्ज क्र.__________________________________________

आधार क्र.:________________________________________

गाव:__________________ तालुका: ____________________

REPL

The Power of Knowledge

# <u>योजने बद्दल थोडक्यात माहिती</u>

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या “सर्वांसाठी घरे २०२२” या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये खालील चार घटक समाविष्ट आहेत.

**अ) घटक क्रमांक एक:- जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा “आहे तेथेच पुनर्विकास करणे” :-** या घटकांमध्ये जमिनीचा वापर साधनसंपत्ती म्हणून करून झोपड्यांचा विकास करणे अपेक्षित आहे. घटक क्रमांक १ साठी केंद्र किवा राज्य शासनाचा हिस्सा अनुज्ञेय राहणार नाही. या योजनेखाली केंद्र शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासनाचे अनुदान म्हणून रुपये १ लक्ष प्रति घरकुल इतके अनुदान अनुज्ञेय राहील.

**ब) घटक क्रमांक २ :- कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. ही योजना राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात राबविण्यात येईल :-** सदर घटकांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना कर्ज संलग्न व्याज अनुदान योजना घरकुलाच्या निर्मितीकरिता व संपादनाकरिता असून यामध्ये कमी व्याज दरावर १५ वर्षाकरिता विविक्षित बँका /गृहनिर्माण वित्तीय व इतर संस्था उपलब्ध करण्यात येईल.व्याजाच्या अनुदानाचा दर रुपये ६ लक्ष पर्यंत ६.५०% इतका राहणार असून १५ वर्षाचा कालावधी लक्षात घेऊन सदर व्याज अनुदानाची सध्याची किंमत (net present value) संबंधित बँकांकडे केंद्र शासकीय यंत्रणांमार्फत थेट जमा करण्यात येणार असून त्याची कमाल मर्यादा रु. ६ लक्ष इतकी राहील.

**क) घटक क्रमांक ३ :- भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती :-** सदर घटकाअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींकरिता शासकीय यंत्रणा व खाजगी संस्थांशी भागीदारी करून घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकल्पांकरिता केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष प्रति घरकुल इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

**ड) घटक क्रमांक ४ :- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना व्यक्तिगत स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान :-** आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील पात्र कुटुंबांना त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर नवीन घरकुल बांधण्यास अथवा राहत्या घराची वाढ करण्यास केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करण्यात येईल.परंतु अश्या लाभार्थ्यांचा समावेश सर्वांसाठी घरे कृती आराखड्यात असणे आवश्यक आहे.या घटकाखाली याज्य शासनाचे अनुदान रु. १ लक्ष पर्यंत राहील.

## महत्वाच्या सूचना

**अर्ज सादर करताना खालील दक्षता घेणे आवश्यक आहे.**

१) कुटुंब म्हणजे पती-पत्नी व अवलंबित मुले-मुली (अविवाहित).

२) कुटुंबाच्या किंवा कुटुंबातील सदस्यांच्या नावावर भारतात कुठेही पक्के घर नसावे परंतु स्वावलंबी मुले-मुली (अविवाहित) अर्ज करू शकतात.

३) कुटुंबाने किंवा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने या अगोदर कुठल्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

४) घरकुल बांधकामासाठी शासकीय खरेदी अंशदान व्यतिरिक्त उर्वरित रकमेची सोय इच्छुक कुटुंबाला स्वतः करावी लागेल.

५) अर्जदाराच्या नावाचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे व अर्ज सादर करताना बँकेचे IFSC कोड असलेले पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.

६) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी सर्व कागदपत्रे विहित नमुन्यात व दिलेल्या अनुक्रमातच आवश्यक आहे.

७) सर्व कागदपत्रे डिजिटली स्कॅन करून साठविण्यात येणार आहे त्यासाठी सर्व कागदपत्राची झेरॉक्स स्वप्रमानीत (Self Attested) व त्यावरील मजकूर व्यवस्थित दिसेल असे द्यावे.

८) सर्व प्रतिज्ञापत्र व अर्जासोबत सादर करावयाचे इतर नमुने स्वप्रमानीतच (Self Attested) द्यावे. याकरिता तहसील कार्यालय व इतर ठिकाणावरून प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही.

९) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(पीएमआरडीए) मध्ये ऑनलाईन घरकुल योजने साठी अर्ज सादर केल्यानंतर अर्ज ऑनलाईन प्रक्रियेकरिता प्राप्त झाल्याची पोचपावती मिळेल. या पावतीवर आपण सादर केलेल्या अर्जाचा ऑनलाईन अर्ज क्रमांक नमूद असेल भविष्यातील संदर्भासाठी ऑनलाईन अर्ज क्रमांकाची नोंद ठेवावी. तसेच अर्जासोबत सादर केलेला मोबाईल क्रमांक (दूरध्वनी) व्यवस्तीत असल्याची खात्री करून घ्यावी.

---

### आवश्यक कागदपत्रे :

**कागदपत्रांचा अनुक्रम**

A) उत्पन्नाचा दाखला (स्वतः प्रमाणित केलेले).

B) अर्जासोबत सादरकरावयाचे प्रतिज्ञापत्र. अर्ज करतेवेळी प्रतिज्ञापत्र साध्या कागदावर द्यावे लागेल पण लाभ मिळतेवेळी ₹ १०० च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक असेल.

C) **कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड**

D) अर्जदाराच्या नावाचे बँकेचे पासबुकची झेरॉक्स प्रत (IFSC कोड असलेला).

E) **जागेच्या मालकीचे कागदपत्रे जसेकी ७/१२ / नमुना ८ / चालू ३ वर्षाची कर पावती.** (**फक्त घटक क्र. ४ करिता**)

<u>गरज भासल्यास लागणारे कागदपत्रे :</u>

E) PAN कार्ड

F) BPL प्रमाणपत्र (BPL असल्यास)

G) जातीचा दाखला (SDO/तहसीलदार)

H) जात पडताळणीचे प्रमाणपत्र

I) राशन कार्ड

J) विधवा असल्याचे पुरावे (विधवा असल्यास)

K) घटस्फोटित/पारितकत्या असल्याचे पुरावे (घटस्फोटित/पारितकत्या असल्यास)

L) अपंगत्वाचे प्रमाणपत्र (अपंग असल्यास)

M) TAX पावती

N) इतर (विद्युत देयक, पाणीपुरवठा बिल, टेलीफोन बिल, इत्यादी)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(पीएमआरडीए) अंतर्गत राबविण्यात येणारी घरकुल योजना मधील सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन व डिजिटल पद्धतीने होत असल्यामुळे सर्व प्रक्रिया अत्यंत पारदर्शक राहणार आहे. ऑनलाईन व डिजिटल पद्धतीने होत असलेल्या या योजनेचा कोणीही गैरफायदा घेऊ शकणार नाही व वशिला पण लावू शकणार नाही यामुळे योग्य लाभार्त्यालाच योजनेचा लाभ देण्यासाठी मदत होईल.

# लाभार्थींची आवश्यक माहिती*

## सर्व माहिती भरणे आवश्यक

पासपोर्ट फोटो

| | प्रथम नाव | मधले नाव | आडनाव |
|---|---|---|---|
| १. घरातल्या मुख्य सदस्याचे नाव (आधार कार्ड प्रमाणे) | | | |
| **Name of Applicant in English (As per Aadhaar Card)** | | | |

२. लिंग ☐ - पुरुष ☐ - स्त्री ☐ - इतर

३. अर्जदाराचा प्रकार ☐ - सामान्य ☐ - अपंग ☐ - विधवा ☐ - घटस्फोटित/पारितकत्या

अपंग असल्यास प्रकार ☐ - अंध ☐ - अंशत: अंध ☐ - कर्णबधिर
☐ - अस्थिविकलांग ☐ - मतिमंद इतर - ______

४. वडिलांचे नाव / पतीचे नाव ______

५. जन्म तारीख ___/___/___ (DD/MM/YYYY)(उदा.17/10/1961)

६. वय ______ वर्ष

७. वैवाहिक स्थिती ☐ - विवाहित ☐ - अविवाहित ☐ - इतर

८. सध्याचा पत्ता आणि संपर्क तपशील

अ. घर / फ्लॅट / दार क्र. ______
ब. रस्त्याचे नाव / पत्ता ______
क. वार्ड क्र. आणि क्षेत्र ______
ड. शहर ______
ई. दूरध्वनी क्र. (Mobile No.) ______
फ. पिनकोड (PIN Code) ______

९. कायमचा पत्ता ☐ – वरील प्रमाणे

अ. घर / फ्लॅट / दार क्र. ______
ब. रस्त्याचे नाव / पत्ता ______
क. शहर / गाव ______
ड. जिल्हा, राज्य ______

१०. विद्यमान(सध्याचा) घर मालकी तपशील ☐ - स्वत:चे ☐ - भाड्याचे ☐ - अन्य

११. सांडपाण्याची व्यवस्था ☐ - नाही ☐ - सक्षम प्राधिकरण गटार ☐ - नाली ☐ - इतर

१२. छप्पर प्रकारावर आधारित सध्याचा घर प्रकार

☐ - पक्का (सीसी आणि स्टोन स्लॅब) ☐ - निम्म-पक्का (तुराट्या / स्टील पत्रक / टाइल्ड) ☐ - कच्चा (गवत / छप्पर, ताडपत्री, लाकडी)

१३. स्वयंपाकघर वगळून घरातील खोल्या संख्या ______

**१४. ओळखपत्र माहिती**

- **अ.** आधार कार्ड क्र.
- **ब.** पॅन कार्ड
- **क.** मतदार ओळखपत्र क्र.
- **ड.** इतर ओळखपत्र नाव
  इतर ओळखपत्र क्र.

**१५. धर्म** ☐ - हिंदू ☐ - मुस्लिम ☐ - ख्रिस्ती ☐ - बौद्ध ☐ - शीख ☐ - जैन ☐ - पारसी ☐ - इतर(स्पष्ट करा)

**१६. जात** ☐ - सामान्य ☐ - अनुसूचित जाती ☐ - अनुसूचित जमाती ☐ - इतर मागासवर्गीय

**१७. बँक तपशील**

- **अ.** बँक खाते क्रमांक
- **ब.** बँक व शाखा नाव
- **क.** IFSC
- **ड.** MICR

**१८. किती वर्षापासून या शहर/ गावात राहत आहात** ☐ - ० ते १ वर्ष ☐ - १ ते ३ वर्ष ☐ - ३ ते ५ वर्ष ☐ - ५ पेक्षा ज्यास्त वर्ष ☐ - ०१/०१/२००० पूर्वीपासून

**१९. विद्यमान(सध्याचा) घराचा आकार घटक (चटई क्षेत्र चौरस फूट मध्ये)**

**२०. कुटुंबाच्या मालकीचे घर किंवा निवासी जमीन भारतात कुठेही आहे का?** ☐ - होय ☐ - नाही

**अ.** हो असल्यास, जमिनीची विस्तारित स्वरुपात माहिती चौ. फुट (Sq.Ft.) मध्ये.
**ब.** खुल्या भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ. फुट)

**२१. रोजगार स्तिथी** ☐ - स्वतःचा व्यवसाय ☐ - पगारदार ☐ - कामगार
इतर -

**२२. घरातील एकत्रित वार्षिक उत्पन्न (रु.)**

**२३. कुटुंबाकडे BPL कार्ड आहे काय** ☐ - होय ☐ - नाही

हो असल्यास, BPL कार्ड क्र.

**२४. कुटुंबाचा खुला भूखंड आहे काय?** ☐ - होय ☐ - नाही

हो असल्यास, खुल्या भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ. फुट)

**२५. लाभार्थी पसंतीचे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्राधान्यकृत घटक निवडा**

☐ - घटक क्र. २ क्रेडिट लिंक अनुदान (कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून)
☐ - घटक क्र. ३ भागीदारी मध्ये परवडणारे गृहनिर्माण (खासगी किंवा शासकीय विकासकाकडून)
- घटक क्र. ४ स्वत:चे बांधकाम (वैयक्तिक स्वरूपातील घरकुल स्वमालकीच्या जागेवर बांधण्यास अनुदान)(स्वमालकीची जागा असणे बंधनकारक)
☐ अ) नवीन घर ☐ ब) विद्यमान घराचे विस्तारीकरण

**२६. सदनिकेसाठी पसंतीचे स्थान**
(फक्त घटक क्र. ३ साठी)

### २७. कुटुंबातील सदस्यांची माहिती (आधार कार्ड आवश्यक)

| कुटुंबप्रमुखाशी संबंध | | | लिंग | वय | ओळखपत्र | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नाव | नाते | वैवाहिक स्थिती | | | आधार | निवडणूक ओळखपत्र | PAN कार्ड |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

### २८. जोडलेली कागदपत्रे

आवश्यक (Essential):

- [ ] - उत्पन्नाचा दाखला (स्वतः प्रमाणित केलेले)
- [ ] - बँकेचे पासबुक झेरॉक्स प्रत (IFSC कोड असलेले)
- [ ] - प्रतिज्ञा लेख कोऱ्या कागदावर (नमुन्याप्रमाणे)
- [ ] - आधार कार्ड

पर्यायी (As applicable):

- [ ] - BPL प्रमाणपत्र
- [ ] - जातीचा दाखला(SDO/तहसीलदार)
- [ ] - जात पडताळणीचे प्रमाणपत्र
- [ ] - राशन कार्ड
- [ ] - विधवा असल्याचे पुरावे
- [ ] - TAX पावती
- [ ] - घटस्फोटित/पारितकत्या असल्याचे पुरावे
- [ ] - अपंगत्वाचे प्रमाणपत्र
- [ ] - सिटी सर्वेचे मिळकत प्रमाणपत्र
- [ ] - भाडेकरू पावती
- [ ] - PAN कार्ड
- इतर - ______

**कुंटूब प्रमुखाच्या स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा** ______

# वार्षिक उत्पन्नाबाबतचे स्वप्रमाण पत्र

मी, ______________________________ स्वप्रमाणित करतो / करते की माझ्या कटुंबामध्ये एकुण ______________________________ सदस्य आहेत . मी व माझ्या कटुंबातील सर्व सदस्याचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये (अक्षरी)
रुपये (अंकात) ______________________________ इतके आहे.

सदर माहिती खोटी निघाल्यास माझ्यावर कायद्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे व त्यासाठी सर्वस्वी जबाबदार मी राहील.

दिनांक :- ____________________ आधार क्र. :- ____________________
ठिकाण :- ____________________ अर्जदाराची सही :- ____________________

**साक्षीदार १ :**

नाव :- ____________________
पत्ता :- ____________________
आधार क्र. :- ____________________
मतदार कार्ड क्र. :- ____________________ सही :- ____________________

**साक्षीदार २ :**

नाव :- ____________________
पत्ता :- ____________________
आधार क्र. :- ____________________
मतदार कार्ड क्र. :- ____________________ सही :- ____________________

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यास अनुदान

# प्रतिज्ञापत्र

१.प्रतिज्ञा लेख लिहून देणार............................

नोकरी/व्यवसाय/मजुरी

राहणार – तालुका जि.पुणे

२. प्रतीज्ञालेख लिहून घेणार :– मा.अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ,पुणे.

सर्वासाठी घरे २०२२ संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल योजनेचा लाभ मिळणे करिता लिहून देतो कि,

१. मी या अगोदर शासनाच्या कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नाही.

२.महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग क.प्रआयो.२०१५/प्र.क्र.११०/गृनीधी.२(सेल)दिनांक ९ डिसेंबर २०१५ अधनुज्ञेय ३० चौ.मी.(३२३ चौ.फुट) पर्यंत चटई क्षेत्रफळाची सदनिका मी स्वत:खाजगी/मान्यताप्राप्त/कंत्राटदार मार्फत बांधून घेण्यास तयार आहे.

३. भारताच्या कोणत्याही भागात माझ्या कुटुंबातील (कुटुंबाच्या व्याख्येमध्ये पती,पत्नी,अविवाहित मुले आणि अविवाहित मुली.याचा समावेश असेल मात्र, कमावता सदस्य तो विवाहित असो किंवा नसो स्वतंत्र घरकुल मिळण्यास पात्र असेल तसेच विविाहित जोडपे एकाच्या नावावर किंया संयुक्तपणे स्वतंत्र्य घरकुल मिळण्यास पात्र असेल.) कोणत्याही व्यक्तीच्या नावे मालकीचे पक्के घर नाही .भारताच्या कोणत्याही क्षेत्रात माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे पक्के घर/सदनिका उघडकीस आल्यास शासनाची फसवणूक केल्याबद्दल माझ्या विरूध्द भा.द.वि प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व योजनेमध्ये बांधकाम करण्यात आलेले शासनाचे पक्के घर/सदनिका शासनातर्फे ताब्यात घेतल्या जाईल याची मला जाणीव आहे.

४.मी शासकीय अनुदानातून बांधलेले घर कोणत्याही व्यक्तिला कधीच विकणार नाही किंवा भाडयाने सुध्दा देणार नाही

५. घरकुल बांधकाम करिता प्राप्त झालेल्या शासकीय अनुदानामधून मी घरकुलाचे बांधकाम करण्या शिवाय इतर कोणत्याही कामावर खर्च करणार नाही,तसे केल्यास /आढळल्यास मी शासकीय नियमानुसार फौजदारी गुन्हयास स्वत:मी जबाबदार राहीन.

६.मी सादर केलेली माहिती/कागदपत्रे खोटी बनावट असल्याचे आढळल्यास ,घरकुल योजनेचा लाभ मिळण्याकरिता मला अपात्र ठरविण्यात येईल यांची मला जाणीव आहे.

७.मला सदर घरकुल आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थी म्हणून रू ३.०० लक्ष पर्यंत आर्थिक मर्यादा असलेल्या उत्पन्नाचा दाखला मी स्वत: प्रमाणित केलेला आहे.सदर उत्पन्नाचा दाखला खोटा आढळल्यास संपूर्ण अनुदान परत करेल.

८.माझ्या स्वत:च्या भुखंडावर जर घर मंजूर झाले तर मला अनुदान प्राप्त झाल्यानंतर मी संपूर्ण घरकुलाचे बांधकाम टप्या टप्याने पूर्ण करेल व तसे न केल्यास संपूर्ण अनुदान परत करेल.

९.संपूर्ण कामाचे लोखंड संकल्पना (RCC Design,Planning,Estimation ) जसे सिमेंट, रेती, मिट्टी, लोखंड नॅशनल बिल्डींग कोड चे नियमावलीनुसार मान्यता प्राप्त खाजगी अभियंत्याच्या मार्गदर्शनाखाली प्राधिकरणाच्या बांधकाम परवानगी प्रमाणे नकाशातील क्षेत्रफळाप्रमाणे बांधकाम पूर्ण करेल तसेच सदर घरकुलाची पुढील देखभाल व दुरूस्ती मी माझ्या स्वखर्चाने करवून घेईल.

१०. सदरहू घराचे बांधकामकरीत असताना सांडपाण्याची व पावसाचे पाण्याची व्यवस्था मी करवून घेईल.

११.मी घराचे बांधकाम करण्याचे कालावधित माझी राहण्याची स्वतंत्र पर्यायी व्यवस्था करवुन घेईल, तसेच बांधकाम करते वेळी काही अपघात झाल्यास त्यास मी सर्वस्व जबाबदार राहील

१२.आर्थिक दृष्टया दुर्बल (EWS) गटाच्या योजने अंतर्गत ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे घर पूर्ण झाल्यावर योजनेच्या नावासहित नामफलक घरकुला/घराचे दर्शनीय भागात स्व:खर्चाने मी लावुन घेईल.

१३.मी सदर घरकुल कर्ज घेवुन बांधल्यास बॅकेत संपूर्ण कर्ज भरण्यास मी स्वत: जबाबदार राहील.

१४.घरकुल मंजुर झाल्यानंतर बांधकाम करते वेळेस जागे संदर्भात काही वाद उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

१५.माझे बांधकाम करावयाची जागा कोणत्याही विकास कामात बाधित होत असल्यास कोणत्याही टप्प्यावरती माझे घरकुल ,अनुदान रद्द करण्यात यावे त्यास माझी कुठलीही हरकत राहणार नाही.

दिनांक : ______________________

ठिकाण : ______________________

गाव: ______________________

तालुका : ______________________

जिल्हा: पुणे ______________________ प्रतीज्ञार्थीची सही:

मी वर नमूद केलेली माहिती ही खरी आहे.ती खोटी आढळल्यास त्यास मी.भा.दं.वि नुसार शिक्षेस पात्र राहील

दिनांक : ______________________

ठिकाण : ______________________

गाव: ______________________

तालुका : ______________________

जिल्हा: पुणे ______________________ प्रतीज्ञार्थीची सही:

## (आवश्यकता असल्यास भरावे)

## प्रतिज्ञालेख (रू.100 किमतीच्या स्टँप पेपर वर)

## (संमतीपत्र)

संमती पत्र लिहून देणार:-____________________________________________

वय वर्षे:-_____ व्यवसाय:-_______

रा.________________________________________

संमती पत्र लिहून घेणार:-___________________________________________

वय वर्षे:-_____ व्यवसाय:-_______

रा.________________________________________

मी श्री./श्रीमती. __________________________________सत्य प्रतिज्ञेवर संमती पत्राचा प्रतिज्ञालेख लिहून देतो/देते कि, मी वरील प्रमाणे राहिवासी असून ______________ग्रामपंचायत हद्दीतील जागा / शेत सर्वे नं./ ग. नं. ________ क्षेत्र _______ हेक्टर _______ आर माझ्या मालकीची व ताब्यात आहे. या जागे पैकी _______ चौ.फु. क्षेत्रफळाच्या भुखंडावर संमती पत्र लिहून घेणार श्री./श्रीमती _______________________________ यांनी त्यांच्या नावाने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मिळण्याकरिता अर्ज सादर केला आहे. आज मितीस जरी या प्लॉटची/जागेची मालकी माझ्या नावे असली तरी सदरील जागेवर श्री./श्रीमती ___________________________________ (संमती पत्र लिहून घेणार) यांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकाम करण्यास माझी कुठलीही हरकत नसून पूर्णपणे संमती आहे. तरी त्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. नात्याने ते/त्या माझे/माझ्या ________________ आहेत.

जागेच्या मालकी बाबत कधीही भविष्यात सुध्दा तक्रार / हरकत / आक्षेप घेणार नाही

करिता हा संमतीपत्राचा प्रतिज्ञालेख मी माझ्या राजी खुशीने पूर्ण सावधानीत असताना दोन साक्षीदारां समक्ष सादर करीत आहे.

ठिकाण:-________________ लिहून देणार:- _________________________

दिनांक:-_____/_____/______

सही:- _________________________

लिहून घेणार:- _________________________

सही:- _________________________

### सत्यापन

मी वर दिलेली माहिती संपूर्ण पणे सत्य व खरी असून ती असत्य निघाल्यास त्यास मी भा.दं.वि. कलम १९९, १९३(२), २०० नुसार कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे

ठिकाण:-________________ लिहून देणार :-_________________________

दिनांक:-_____/_____/______

सही:-_________________________

साक्षीदार:-(१)________________________

सही:-_________________________ लिहून घेणार :-_________________________

साक्षीदार:-(२)________________________ सही :-_________________________

सही:-________________________